**विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना - विचारगट/समिती स्थापन करण्याबाबत**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः न्यायाप्र १८१४/(१६५/१४)-एस.डी.४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २५ नोव्हेंबर, २०१४.

**वाचा :-**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्रमांकः सुप्राअ-२००६/(३४/२००६)-प्राशि-५, दिनांक १९ एप्रिल,२००६**

**प्रस्तावना :-**

शालेय विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना व या उपाययोजना करताना येणाऱ्या अडचणी याबाबत नेमके उपाय ठरविण्यासाठी विचारगट/समिती स्थापना करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

शालेय विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत करावयाच्या उपाययोजना व या उपाययोजना करताना येणाऱ्या अडचणी याबाबत नेमके उपाय ठरविण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१) शिक्षण संचालक (प्राथमिक) - अध्यक्ष
२) उपसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - १ सदस्य.
३) बालमानस शास्त्रातील तज्ञ - १ सदस्य
४) संस्थाचालक प्रतिनिधी - १ सदस्य
५) शाळा मुख्याध्यापक प्रतिनिधी - १ सदस्य
६) पालक प्रतिनिधी - १ सदस्य
७) शैक्षणिक क्षेत्रात या विषयाशी संबंधीत कार्य करणारा एक प्रतिनिधी - १ सदस्य
८) शिक्षण उपसंचालक (प्राथमिक) - सदस्य सचिव

विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत करावयाच्या उपाययोजना व त्यांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी याबाबत नेमके उपाय सुचविण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी समितीतील सदस्यांची नावे निश्चित करावीत व बैठका घेऊन दोन महिन्यांच्या आत शासनास अहवाल सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४११२५१६५२१४६१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Krishnrao Thube

Digitally signed by Prakash Krishnrao Thube
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Krishnrao Thube
Date: 2014.11.25 17:02:19 +05'30'

**प्रकाश ठुबे**
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,
६. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे,
७. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना जनहित याचिका ५३/२०१४ च्या अनुषंगाने.

प्रत,

१. स्वीय सहायक, सचिव (शालेय शिक्षण), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
२. स्वीय सहायक, सह सचिव (शालेय शिक्षण), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
३. स्वीय सहायक, उप सचिव (विधि), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
४. निवड धारीका, एस.डी.४ कार्यासन.